# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.04.2025** **वार-बुधवार**

---

**राष्ट्रीयआयुषमिशन**

आयुष मंत्रालयानं राष्ट्रीय आयुष मिशन परिषद 2025 चं आयोजन केलं असून पुण्याजवळच्या लोणावळा इथल्या कैवल्यधाम योग संस्थेमध्ये उद्या आणि परवा ही परिषद होणार आहे. या परिषदेचं उद्घाटन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय आयुष अभियानाच्या माध्यमातून देशातील आयुष सेवा बळकट करणं, योजना यशस्वी करण्यासाठी आर्थिक व्यवस्थापन आणि मूल्यांकन करणं, आयुष औषधांची गुणवत्ता सुधारण आदी विषयावर या परिषदेत चर्चा होणार आहे.

**माऊलींचा750वा जन्मोत्सव**

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या 750व्या जन्मोत्सवानिमित्त आळंदी देवस्थानच्या वतीने 3 मे ते 10 मे या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि अखंड हरिनाम सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. संस्थानचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी आज ही माहिती दिली. पारायणासाठी साडेतीन हजार भाविकांनी नोंदणी केली आहे. या सोहळ्यासाठी आळंदी देवस्थान, आळंदी नगरपरिषद आणि ग्रामस्थ एकत्रितपणे नियोजन करत आहेत. ग्रामस्थांनी नियोजनाच्या तयारीसाठी तेरा विविध समित्या तयार केल्या आहेत.

**अक्षयतृतीया**

साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेचा आज सर्वत्र उत्साह आहे. या दिवशी नवीन, गृह खरेदी, सोने खरेदी करण्याची प्रथा आहे, या निमित्तानं ठीकठिकाणच्या बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण आहे. पुण्यात दगडूशेठ गणपतीला  आज ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य दाखवण्यात आला. गणरायाभोवती आंब्यांची आकर्षक आरास करण्यात आली आहे, तसंच प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यापर्यंत फुलांची सजावटही आहे, अक्षय तृतीयेनिमित्त गणेश दर्शनासाठी भाविकांनी पहाटे पासूनच मंदिरात मोठी गर्दी केली आहे.

**महात्माबसवेश्वर**

सामाजिक क्रांतीचे उद्गाते महात्मा बसवेश्वर आणि एकात्मतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची आज जयंती आहे. या निमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील सरस्वती सभागृहात  प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**पूलउद्घाटन**

पुण्याच्या नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावर पुणे महापालिकेनं उभारलेल्या  विठ्ठलवाडी ते फन टाइम चित्रपटगृहादरम्यानच्या उड्डाणपूलाचं उद्घाटन उद्या १ मे रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. सोमवारी या रस्त्यावर नागरीकांन मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला होता; हा पूल वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर इथली वाहतूक कोंडी कमी व्हायला मदत होणार आहे.

**pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला २०३२ साली ५० वर्ष पूर्ण होणार आहेत. यासाठी महापालिकेच्या वतीने शहराच्या भविष्यातील सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासासाठी "पीसीएमसी@५०" शहर नियोजन धोरण राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शहरातील विविध घटकातील २० हजार नागरिकांचं सर्वेक्षण केलं जाणार आहे. शहरातील विविध स्वयं सहायता गटातील २५०हून अधिक महिला हे सर्वेक्षण करणार आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणारं हे सर्वेक्षण तीन आठवड्यांत पूर्ण करण्याचं नियोजन आहे. या शहर नियोजन उपक्रमात शहरी वाहतूक, पर्यावरण, तंत्रज्ञान, प्रशासन, पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकास अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

**<u>पुरस्कार</u>**

जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या वेळी शौर्याने लढून विजयश्री खेचून आणणारे केंद्रीय राखीव सुरक्षा दलातील असिस्टंट कमांडर झिले सिंह यांना आज 'सूर्यदत्त राष्ट्रीय शौर्य पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आलं. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक संजय चोरडिया यांच्या हस्ते झिले सिंह यांचा सन्मान करण्यात आला. पुलवामामध्ये माझे सहकारी जखमी होत होते, हुतात्मा होत होते. त्यांच्या त्यागाचा बदला घेण्याची भावना माझ्या मनात होती. जखमी झालो तरी आत्मविश्वास तुटू न देता भारतीय सेना विजयी होईपर्यंत बेभान होऊन लढत राहिलो, अशा भावना झिले सिंह यांनी यावेळी व्यक्त केल्या.

**<u>जिजाऊरथयात्रा</u>**

मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड आणि इतर संघटनांच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या जिजाऊ रथयात्रेचा समारोप उद्याच्या महाराष्ट्र दिनी पुण्यात होणार आहे, अशी माहिती मराठा सेवा संघाचे विजयकुमार ठुबे आणि संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर घाडगे यांनी दिली. उद्या सकाळी 9 वाजता दापोडी इथून रथयात्रेला सुरुवात होईल, आणि संध्याकाळी 5 वाजता ही यात्रा लाल महाल इथं पोहोचणार आहे.

**<u>क्रीडा</u>**

बाणेर गावचं ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांच्या उत्सवानिमित्त उद्या एक मे रोजी बाणेर केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्या मान्यतेने गादी प्रकारात विविध गटात या स्पर्धा होणार आहेत. यावेळी महिला कुस्तीचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उन्हाची काहिली वाढत असून आज कमाल तापमान ४० अंश तर किमान तापमान २४ अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापामान राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**